## बाष्पक प्रचालन अभियंता परीक्षेकरिता आवश्यक अर्हता व अनुभव.

१. अर्जदाराचे वय २३ वर्षापेक्षा कमी नसावे.

२ Degree or Diploma in Mechanical OR Electrical OR Electrical & Electronics OR Chemical OR Power Plant OR Production OR Instrumentation OR Instrumentation & Control Engineering OR Diploma in Mechatronics Engineering from a recognized Institution University यापैकी उमेदवार उत्तीर्ण असावा व त्याने प्रमाणपत्र व सर्व गुणतक्त्याची स्वयं सांक्षाकित प्रत अर्जासोबत जोडावी.

३. ज्या बाष्पकाची तपनक्षमता ही १००० मी$^2$ पेक्षा कमी नाही किंवा बाष्पकांच्या सर्व संचाची एकुण तपनक्षमता १००० मी$^2$ व त्यातील एका बाष्पकाची तपन क्षमता कमीत कमी ५०० मी$^2$ पेक्षा कमी नसावी. अशा बाष्पकावर सहाय्यक अभियंता किंवा अभियंता म्हणून सलग दोन वर्षे ( पदवी धारकांसाठी) व सलग ५ वर्षे ( पदवीका धारकांसाठी) प्रचालन आणि/किंवा देखभाल या कामाचा अनुभव असावा.

किंवा

४. National Power Training Institute मधुन पदवी किंवा पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र धारकांसाठी बाष्पकावरील सलग १ वर्षे कामाचा अनुभव असावा.

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना.

१ बाष्पक प्रचालक अभियंता परीक्षेचे शुल्क रु.१५००/- ई-पेमेंटने ऑन लाईन पध्दतीने (www.gras.mahakosh .gov. in) जमा करावे व मूळ चलनाची प्रत अर्जासोबत जोडावी.

२ ज्या प्रमाणपत्रात (दाखल्यात) उमेदवाराची जन्मतारीख, त्याचे जन्मस्थळ व तो भारताचा नागरीक आहे असा उल्लेख केलेले तालुका, जिल्हा, अप्पर जिल्हा दंडाधिकारी, अप्पर महानगर दंडाधिकारी मुंबई किंवा पारपत्र अधिकारी यांनी दिलेले भारतीय नागरीकत्व प्रमाणपत्राची स्वयं साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

३ शैक्षणिक अर्हता, वय व नागरीकत्व इत्यादी प्रमाणपत्रांच्या प्रती स्वयं साक्षांकित केलेल्या असाव्यात. स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र **(Self Declaration)** प्रपत्र-ब, अर्जासोबत जोडण्यात यावे, नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

४ अनुभवाचे (सेवा) प्रमाणपत्र या अर्जासोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणेच असावे व यातील सर्व तपशील हा आपण ज्या विभागात कार्यरत आहात, तेथील बाष्पकांचे निरीक्षण करणा-या विभागीय अधिका-याकडून पडताळणी केलेले असावे व त्यावर त्यांची सही व शिक्का असावा. असे सेवा प्रमाणपत्र त्याच्या मूळ प्रतीसह आणि छायांकित प्रतीसह अर्जास जोडलेले असावे, नसल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल.

५ उमेदवाराने स्वतःचे अलिकडील तीन रंगीत छायाचित्रे, ज्यांची छायाचित्रातील मागील बाजू पांढरी असावी व त्याचा आकार हा ६५ मी.मी. उभा X ५० मी.मी. आडवा असा असावा व यापैकी एक रंगीत छायाचित्र अर्जावर दर्शविण्यात आलेल्या चौकटीत चिकटवून त्यावर स्वतःची स्वाक्षरी करण्यात यावी. उर्वरित दोन छायाचित्रांच्या मागील बाजूस उमेदवाराने स्वतःचे नांव व स्वाक्षरी करुन ती बंद लिफाफामध्ये घालून अर्जासोबत जोडावे.

पुढे चालू ........ २.

६ अर्जासोबत सादर केलेल्या सर्व स्वयं साक्षांकित प्रमाणपत्रांची मूळ प्रमाणपत्रे ही लेखी परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य असेल अन्यथा लेखी परीक्षेला बसू दिले जाणार नाही.

७ अर्जासोबत शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी किंवा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी (Registered Medical Practitioner) यांनी दिलेले शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्र जोडण्यात यांवे. नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी यांनी दिलेल्या शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्रावर त्यांचा वैद्यकीय नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

८ अर्ज पाठविण्याचा पत्ता :- संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, ७वा मजला, प्लॉट क्रं.सी-२०, ब्लॉक- ई, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक -०२२-२६५७१२०१/२६५७१३०४

९ पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर, सदर प्रवेशपत्रावर अर्जासोबत जोडण्यात आलेल्या छायाचित्राप्रमाणेच स्वतःचे छायाचित्र चिकटवावे व त्यावर आपण ज्या कंपनीत सध्या कार्यरत आहात त्या कंपनीने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची सही व शिक्का घेण्यात यावा. तसेच पात्रता यादीत नांव असलेल्या पात्र उमेदवारास विहित मुदतीत प्रवेश पत्र मिळाले नाही, अशांनी परीक्षेचे वेळी आपण ज्या कंपनीत कामास आहात, तेथील त्यांचे स्वतःचे छायाचित्र असेलेले आस्थापनाचे ओळखपत्र सोबत घेवून यावे.

६/३/२०.

प्र. सहसंचालक, बाष्पके आणि
सचिव, परीक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.